# नागपूर जिल्हयातील नरखेड तालुक्यातील धार्मिक स्थळे : एक ऐतिहासिक अध्ययन

**प्रियंका दिलीप मदनकर**
संशोधक
रा. तु. म. नागपूर विद्यापीठ
Email ID - priyankamadankar2020@gmail.com

**प्रा. डॉ. प्रज्ञा भा. कामडी**
नगर परिषद शिवाजी महाविद्यालय मोवाड ता.नरखेड जि
नागपूर
Email ID - prfkamdi47@gmail.com
मो.नं ९४२२१४४२०३

Crossref DOI - https://doi.org/10.63665/rh.v7i2.129

---

***सारांश :***

*महाराष्ट्रातील नागपूर जिल्हयातील नरखेड तालुका हा विविध पुरातन धर्मियांचे पवित्र तीर्थस्थान असून, ऐतिहासिक आणि धार्मिक दृष्टया या गावाचे महत्व अनन्यसाधरण आहे. नरखेड हे गाव मंदाकिनी उर्फ मदार या नदीच्या काठावर असून ही नदी गावाच्या मध्यभागी उत्तर . दक्षिण दिशेने वाहात असते. नरखेड तालुक्यात १५४ गावे आहे आहे. महाराष्ट्र राज्याच्या शेवटचा तालुका असून मध्यप्रदेशाला लागुन आहे. नरखेड तालुक्यांचे वैभव ठरू शकतील असे पुरातन धार्मिक स्थळे या ठिकाणी पाहावयास मिळतात. संत्रा उत्पादकाचा तालुका तसेच आशिया खंडातील सर्वात मोठी बाजार पेठ म्हणून नरखेड शहराची ओळख आहे. नरखेड शहर हे मध्य रेल्वेला जोडलेले असून नागपूर ते दिल्ली रेल्वे लाईन नरखेड शहरातून गेली आहे.*

**ब्रिज संज्ञा :** तीर्थक्षेत्र, मुकंदराज महाराज, कुंडबाबा, ज्वालागीर महाराज, शिवलिंग, उदासी महाराज, कोलाबर्डी

---

**प्रस्तावना :**

महाराष्ट्रातील नागपूर जिल्हयातील नरखेड हे गाव नागपूर पासुन ८७ कि.मी अंतरावर असून १५४ गावे आहे. या तालुक्याचे अक्षवृत्तीय स्थान २१॰ ३०’ ते २१॰ ३५’ तर रेखावृत्तीय स्थान ७८॰ १५’ ते ७८॰ २०’ पूर्व रेखांश आहे. नरखेडचा इतिहास धार्मिक परंपरेने व्यापून आहे. येथे संत महात्मयाचे अनेक तपस्वी त्यागी वैरागी ऋषीमुनी संताचे वास्तव्य होते.नरखेडच्या पुर्व भागाला असणारे कर्नागड डोंगर निसर्गरम्य सौदर्याचा नजराना असुन सुर्य उदयाची सुरूवात सोनेरी प्रकाशात उत्साहभराने चैतन्यमय असते तर पश्चिमेला कोलाबर्डीच्या टेकडीवरून मावळतीचा सुर्य चैतन्यमय विसावा ठरतो.उत्तरेला ज्वालागीर महाराजाचे देवस्थान असून दक्षिणेला ऋषीश्वर देवस्थान आहे. येथे एक तलाव असून त्या तलावांमध्ये लाल रंगाचे कमळाचे फुले होत.तसेच बेलोना येथील रथयात्रा, जलालखेडा येथील सोमश्वर मंदिर, घोगरा येथील मन्नाथेश्वर मंदिर, उदासी महाराज देवस्थान इ. मंदिर हे पुरातन असुन यामागे फार मोठा इतिहास लपलेला

आहे.

**उद्दिष्टये :**

१. नागपूर जिल्हयातील नरखेड तालुक्यातील धार्मिक स्थाळाचे ऐतिहासिक व धार्मिक महत्व जाणून घेणे.
२. नागपूर जिल्हयातील नरखेड तालुक्यातील दुर्लक्षित स्थळांना प्रकाशित करणे.

**१. बंदी हनुमान मंदिर :**

नागपूर जिल्हयातील नरखेड या गावापासून ५ कि.मी अंतरावर बेलोना हे गाव आहे. हे गाव बंदी हनुमान मंदिर म्हणून ओळखले जातात. बंदी या शब्दाचा अर्थ बंदिस्त असा होऊन येथील हनुमानाला वर्षभर बंदिस्त ठेवले जातात. या हनुमानाबद्दल अशी आख्ययिका सांगितली जातात की, बेलोना या गावामध्ये एक नरहरी जोशी नावाचे व्यक्ती राहात होते. ते वेदशास्त्रात कुशल असल्यामुळे गावकरी लोक त्यांचाशिवाय कोणतेही शुभकार्य करीत नव्हते. एक दिवस बेलाना या गावामध्ये एका गोठयाला भयानक आग लागली ती आग विझविण्याचा प्रयत्न गावकरी लोक करीत होते, तरीसुध्दा आग विझत नव्हती तेव्हा जमीनीमधून हू... हू... अशा आवाज येऊ लागला व गावकरी लोकानी जोशी यांच्या घराकडे धाव घेतली व त्यांना बोलावून आणले त्यावेळी जोशीना ज्ञात झाले की, इथे बजरंगबलीची मुर्त आहे ही मुर्त एका पेटीमध्ये असून ही पेटी जमिनाखाली जात होती त्यावेळी जोशीनी हात जोडून प्रार्थना केली की, काही चुकले असेल तर माफ करा व आम्हाला दर्शन दया जोशीची विनंती स्विकारून पेटी वर येऊ लागली व त्यातून मूर्ती बाहेर काढली ही मुर्ती बाल अवस्थेत असून हात जोडून होती. त्यानंतर गावकऱ्यांनी मुर्तीची पुजा करून मुर्तीची स्थापना विठ्ठल मंदिराच्या बाजूला केली. तेव्हापासून बेलोना येथे रथयात्रा म्हणजेच हनुमान प्रकटदिन म्हणून उत्साव साजरा केला जातो. असे म्हणतात की, २६० वर्षाहून जास्त परंपरा या रथयात्रेला आहे. मार्गशीष चर्तुथीला या बाल मुर्तीची विधीनुसार पुजा.अर्चा केली जाऊन अडीच दिवस बाहेर काढून पहिल्या दिवशी सांयकाळी मुर्तीला रथामध्ये ठेऊन गावामध्ये रथ फिरविले जातात. व नंतर दुसऱ्या दिवशी मुर्तीचा अभिषेक केला जातो. व तिसऱ्या दिवशी लाहीचा कार्यक्रम पार पडतो या प्रसादस्वरूप लाहीचा उपभोग घेण्यासाठी  दुरदुरून भाविक गर्दी करतात. ही बजरंगबली मुर्ती तिन्ही दिवस वेगवेगळे रूप प्रकट करून पहिल्या दिवशी हास्य, दुसऱ्या दिवशी शांत तर तिसऱ्या दिवशी रौद्र अशी ही स्वंयभू बजरंग बली मुर्ती असून ही नवसाला पावणारी इच्छापूर्ण करणारी आहे.



**२. ऋषीश्वर मंदिर :**

महाराष्ट्रातील नागपूर जिल्हयातील नरखेड हे गाव नागपूर पासुन ८७ कि.मी अंतरावर असून नरखेड शहराच्या दक्षिण दिशेला पुरातन असे ऋषीश्वर मंदिर व तलाव आहें.येथे अनेक साधूसंत, ऋषीमुनी यांनी या ठिकाणी वास्तव्य केले. १११०मध्ये मराठीचा आदयग्रंथ विवेकसिंधु ची रचना मुकुंदराज महाराज यांनी केली. श्री मुकुंदराज महाराज हे विरक्त, वैराग्य स्वभावाचे असून ५ वर्षाचे असतांना अंभोरा येथील पर्वतावर चढुन १२ वर्ष तपश्चर्या केले. त्या नंतर ते तीर्थयात्रा करीत राहीले त्यावेळी अंबेजोगाईला जयपाल नावाचे राजा मिळाले त्यांना ब्रम्हाज्ञान मिळविण्यास इच्छा जागृत झाले व ते नरखेड या गावी आले.त्यावेळी नरखेड येथिल साधूसंताला म्हणाले मला ब्रम्हज्ञान दाखवा त्यावर साधूसंत काही न बोलल्याने राजाला राग आला.व त्यांनी रागात येऊन टिकास फावडे साधू संताच्या हातात देऊन तलावाच्या खोदकामास लावले तेवढयातच श्री मुकुंदराज स्वामी तिथे आले त्यांनी हे सगळे कृत्य बघताच काम थांबवण्यास लावले व राजाला म्हणाले तू मुर्ख आहेस का असे म्हणू लागले व श्री मुकुंदराज स्वामीच्या योग साधनेने टिकास ,फावडे आपोआप काम करू लागले. हा सर्व चमत्कार पाहून राजाला आश्‍चर्य वाटले व राजा स्वामीच्या पाया पडू लागले. व काही काळ स्वामी नरखेड येथे वास्तव्य करू लागले. त्यामुळे या परिसराला श्री मुकुंदराज स्वामी महाराज यांच्या नावाने ओळखले जातात. पूर्वी ऋषीश्वर तलावाच्या मध्यभगी एक विहिर असून या विहिरीचे पाणी वर पर्यत वाहून ते गोमुखातून तलावामध्ये वाहात होते. या तलावाला बाराही महिने पाणी राहून या तलावामध्ये लाल रंगाचे फुले होते सूर्यकिरणाच्या प्रकाशात कमळाचे फुले फुलून तलावाचे सौदर्य अधिकच नयरम्य दिसून, शांतता व पवित्रता अतुलनीय नैसर्गिक सौदर्याचे प्रतीक मानले जात होते. या तलावाकाठी एकांत म्हणून साधू ऋषीमुनी ध्यान साधना करायचे तलावाच्या बाजूचा दगडाचा हा घाट श्रीमती गौरी बाई या नावाच्या स्त्रीने बांधला त्यामुळे त्या घाटाला ‘गौरी घाट’ म्हणून ओळखले जातात. तलावाच्या काठावर सभोताल पायऱ्याची व्यवस्था केलेली असून सभेताल अंजणीचे झाड आहे.या तलावाच्या बाजूला एक शमी वृक्षाचे झाड आहे. या तलावाच्या काठावर दरवर्षी .ऋषीपंचमी ,वसंतपंचमी उत्सव साजरा केला जातो. भारतीय संस्कृतीत हिंदू धर्मातील ऋषीपंचमी हा व्रत विविध महिला करत असतात. या व्रताचे उदयापण करण्याकरिता विविध स्त्रिया ऋषीश्वर तलावाकाठी येऊन कमळ नदीत स्नान करून सात. ऋषी साधूची पूजा.अर्चा केली जातात. त्यामुळे या ऋषीश्वर तलावाला एक ऐतिहसिक महत्व प्राप्त झाले आहे. ऋषीश्वर तलावाकाठी विविध पुरातन मंदिरे असून परमपुज्य श्री मुकूंद ऋषीश्वर महाराज मंदिर, विश्वकर्मा मंदिर, गणपती मंदिर, हनुमान मंदिर, गायत्री मंदिर तलावाकाठी आहे. हनुमान मंदिर हे श्रीमती बायनाबाई कळंबे या स्त्रीने पुढाकार घेतला. विश्वकर्मा मंदिर हे सुतार समाजातील लोकानी बांधलेले असून दरवर्षी विश्वकर्मा जयंतीला येथे किर्तन, महाप्रसादाचा कार्यक्रम होऊन सुतार समाजातील तसेच इतर समाजातील लोक या ठिकाणी एकत्र येतात.




### ३. सोमेश्वर मंदिर :

नागपूर जिल्हयातील नरखेड तालुक्यातील जलालखेडा हे गाव नागपूर पासून ८३ कि.मी अंतरावर असून नरखेड पासून २४ कि.मी अंतरावर आहे. सोमेश्वर मंदिर :हे वर्धा व जाम नदीच्या संगमावर असून स्वयंभू आहे. या मंदिराला धार्मिक तसेच ऐतिहासिक महत्व असून हा एक किल्ला आहे. या किल्लयाची मूळ ओळख फुसली गेली आहे. आज हा किल्ला कमी व मंदिर म्हणून जास्त प्रचलित आहे. हा किल्लाचा परिसर २५ एकराचा असून मंदिरामध्ये प्रवेश करण्यासाठी किल्याच्या प्रवेशव्दारातून जावावे लागतात. या मंदिराच्या सभामंडपात श्रीराम लक्ष्मण सीता, रूक्मिणी , गणपती मंदिर, हनुमान मंदिर, आहे. सभामंडप व गर्भग्रह अशी सोमेश्वर मंदिराची रचना आहे. सभामंडपातील नंदीच्या मुर्तीपासुन ४ पायऱ्या चढून गर्भग्रहात असलेल्या शिवलिंगापर्यत पोहचावे लागतात. हे मंदिर वाकाटक कालीण असून ऐंतिहासिक नोंदी नुसार प्रथम रघुजीराजे भोसले यांच्या ताब्यात हा किल्ला होता. या मंदिरा बददल अशी आख्यायिका सांगितली जाते की, प्राचीन काळामध्ये या मंदिरातील पिंड ही सोंन्याची होती या पिंडामध्ये आपले रूप पाहिले असता पुढचा जन्म कोणता असेल याचे रूप पिंडामध्ये दिसत होते अशी भाविकांची श्रध्दा असल्यामुळे महाशिवरात्रीला येथे गर्दी असते.

 

### ४. मन्नाथेश्वर मंदिर :

नागपूर जिल्हयातील नरखेड तालुक्यातील घोगरा हे गाव नागपूर पासून ८७ कि. मी अंतरावर असून नरखेड पासून ३७ कि.मी अंतरावर आहे हे मंदिर एका टेकडीवर स्थित असून येथे श्री राम लक्ष्मण व सीता यांचे काही काळ वास्तव्य केंल्याचे आढळते. टेकडीच्या पायथ्याशी सीतेचे न्हाणी असून ते एक तीर्थस्थान आहे. हे एक हेमाडपंती मंदीर असून सभामंडप ,अंतराळ व गाभारा अशी रचना आहे सभामंडपामध्ये १६ दगडी स्तंभ, अंतळात नंदी, तेथून ३ फुट खाली गाभाऱ्यामध्ये चौकोणी आकारामध्ये शिवपिंड असून गर्भग्रह अंतराळावर उंच शिखर आहे. मन्नाथेश्वर मंदिराच्या बाजुला गुरू मच्छिद्रनाथ यांची मुर्ती असून या मंदिरात त्रिकोणी आकाराची शिळा आहे मच्छिद्रनाथ बाबा हें नवसाला पावतात अशी आख्ययिका असुन तिथे एक घोगलीच्या झाडाला लाल कपडयाच्या चिंध्या बोधून नवस पूर्ण करतात.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे अनेकदा या मंदिरामध्ये कार्यक्रम झालेले असून त्यांचे एक

लहानशे गडावर मंदिर आहे., रामदास महाराजानी ११ वर्ष या मंदिरामध्ये तपश्चर्या केली त्यांची या गडावर समाधी असून प्रत्येक सोमवारला मंदिरामध्ये भाविकांची गर्दी असते.



## ५. ज्वालागीर महाराज मठ :

नागपूर जिल्हयातील नरखेड तालुक्याच्या उत्तरेला १.७ कि. मी अंतरावर ज्वालागीर मठ आहे. ४०० वर्षीपूर्वी महाराज हे भ्रमण करीत नरखेडच्या उत्तर दिशेला आले.व मदार नदीच्या काठी राहीले. ज्वालागीर महाराज यांचा वेषभूषा ही पांढरे वस्त्र तर कधी भगवी असत महाराज कधी पायदळ तर कधी घेडयावर भ्रमण करीत असे. महाराज गावामध्ये आले हे कळण्यासाठी कंबरीला घंटा बांधलेला असायचा एकदा मदार नदीला पुर आला त्यावेळी या पुराचे पाणी मठा मध्ये गेले नाही हा चमत्कार सपूंर्ण जनता बघत होती. या चमत्कारामागे ज्वालागीर महाराज यांची श्रध्दा,योगविदया होती असे मानावे लागेल. ज्वालागीर महाराज भ्रमण करित असताना बहीराम बाबा यांच्या ठाण्यावर पोहचले व तिथे ध्यान अवस्थेत बसले त्यावेळी बहीरामबाबाच्या सदिच्छेने महाराजाना तांत्रिकविधी प्राप्त झाली.

ज्वालागीर महाराज महान योगी असल्यामुळे ते रोज आपल्या अवयाची समाधी लावत होते. त्यांनी शिष्यांना सांगितले की, मला आवाज दिल्या शिवाय कोणीही अंदर यायचे नाही. परंतु एकदा शिष्य आवाज न देता महाराज जवळ गेले व त्यांनी महाराजाच्या अवयाला हात सुध्दा लावले व नंतर ते अवयव कधीही जुळले नाही. त्यानंतर शिष्यांनी ते अवयव एकत्र गोळा करून त्याची समाधी तयार केली. तोच हा ज्वालागीर मठ म्हणून ओळखले जाते.उत्तर दिशेला मुख असलेली ज्वालागीर महाराजांची मुर्ती असुन समोरच हनुमंताची मूर्त, बाजूला शिंवलिग आहे. व बाहेर बहिरामबाबाचे मंदिर आहे.

फाल्गुन पौणिमेच्या पाडव्याला होळीच्या दुसऱ्या दिवशी म्हणजेच धुलीवंदनाच्या दिवशी मदार नदीच्या काठी ज्वालागीर मठाच्या साक्षीने दरवर्षी नवहर्षोल्हासात जमणारी गर्दी म्हणजे गळ यात्रा होय.या गळयात्रेला धर्मिक परंपरा लाभलेली असून इंद्रदेवताला पंसन्न करण्याकरिता शेतकऱ्यांना गावऱ्यांना भरपूर प्रमाणात पाणी मिळविण्याकरिता इंद्रदेवतेची पुजा– अर्चा केली जातात. आर्थिक वर्षाची सुरूवात म्हणून इच्छूक व्यक्ती कडक व्रत करून एका उंच खंब्यावर चढून स्वताला दोरी किंवा दुप्टयाने बांधून इंद्रदेवताला हात जोडून प्रदक्षिणा घातल्या जातात.

Volume-7 (2026)
Special Issue-2 (March)
RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN
2582-9173
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com



**६. उदासी महाराज मठ :**

नागपूर जिल्हयातील नरखेड येथे उदासी महाराज देवस्थान असून मंदार नदी किनारी एका चौकात आहे. सुरूवातीला येथे अमरदास महाराजांचे वास्तव्य होते.त्यांचा मृत्यू झाल्यावर नकुदास महाराज येथे वास्तव्य करू लागले.ऐके वेळी महाराजानी आपल्या शिष्याला सांगितले की, .ऋषीश्वर तलावातून पाणी आणायला सांगितले तो तलाव संपूर्ण कोरडा होता. महाराजांनी सांगितले की, तिथे गड्डा करा त्यानंतर तिथे पाणी लागेल.हा चमत्कार पाहून शिष्य आश्चर्यचकित झाले.

गुरूवर्य नकुदास महाराज याचे भारतामध्ये ५२ मठ असून, उत्तरप्रदेश, मध्यप्रद्रेश व महाराष्ट्रामध्ये नागपूर, जलालखेडा व नरखेड हे त्यांचे प्रमुख मठ होय. नकुदास महाराज विरक्त वृत्तीचे साधूपुरूष असून आपल्या शिष्याला वेळोवेळी मार्गदर्शन करणारे होते. या मंदिराचा परिसर हा १.२५ एकर असून या मठाला ‘भावरीचा मठ’ म्हणून ओळखले जाते.

निकुदास महाराज यांचे नरखेड तालूक्यामध्ये अनेक शिष्य असून माणिकवाडा, येरला, मोगरा, नागपूर येथे त्यांचा मोठा शिष्य परिवार आहे. गुरूपौणिमा, कोजागिरी , हनुमान जंयती इ. उत्सव उदासी मठामध्ये साजरा केला जातो.




**७. कोलाबर्डी मंदिर :**

नागपूर जिल्हयातील नरखेड तालुक्यापासुन १ कि. मी अंतरावर पश्चिम दिशेला कोलाबर्डी नावाची

टेकडी आहे. या टेकडीवरून संपूर्ण नरखेड गावाचे सौंदर्य दृष्टीस येते. या टेकडीवर वनविभगाचे विश्रामग्रह आहे.तसेच येथे गोंविद महाराज समाधी, हनुमान मंदिर, गरूड मंदिर, विठ्ठल रूक्मिणी मंदिर आहे.

गोंविद महाराज यांची कोलाबर्डीच्या टेकडीवर समाधी आहे. त्याचा जन्म काटोल तालुक्यातील डोरली या गावात एका सामान्य कुटुबांत झाला. ते अत्यंत विरक्त, वैराग्य अवस्थेत जिवन जगत होते. गोविंद महाराज कर्नागड टेकडीवर रामकृष्ण हरी चे भजन करत होते. त्यावेळी पेठेवरची 'कोली ' नावाची म्हातारी गवत आणण्यासाठी गेली तिला रामकृष्णहरी असे भजन ऐकू आले.त्या म्हातारीने गावात येऊन सांगितले व गावकरी महाराजाचा शोध घेऊ लागले.सर्वप्रथम कोली नावाच्या म्हातारीला महाराज दिसल्यामुळे या टेकडीला 'कोलाबर्डी 'नाव पडले. त्यानंतर महाराज एका झोपडीत राहू लागले.गावकऱ्याच्या सहकाऱ्याने महाराजानी कोलाबर्डीवर विठ्ठल रूख्मणी मंदिर बांधले.

## ८. **कर्णागड मंदिर :**

नागपूर जिल्हयातील नरखेड तालुक्यातील ४ कि. मी अंतरावर असलेल्या पिठोरी या गावात कर्णागड नावाची एक उंच अशी टेकडी असून त्यावर शंकर भोलेनाथाची मुर्ती आहे.या मुर्तीला चार हात असून एका हातात त्रिशूल ,दुसऱ्या हातात डमरू व तिसऱ्या हातात पाण्याचे तांब तर चौथ्या हात हा आर्शिवाद देण्याकरिता आहे. शंकराची मुर्ती ही अंदाजे ५ फुट `उंच असून मांर्बलची आहे. त्याच्या आसनावर दोन प्राण्याचे छायाचित्रे कोरलेले असून ते ध्यानस्थ अवस्थेत बसलेले आहे.व सभोताल शिवलिंग व नंदी आहे.

कर्णागड हा शब्द महाभारताशी संबधित असून कर्नागड हा परिसर अगोदर दुर्योधनाचा असून दुर्योधनाने कर्णाला मित्र बनविण्यासाठी हा संपूर्ण परिसर कर्णाला दिला त्यामुळे या टेकडीला 'कर्णागड' असे नाव पडले. या टेकडीवर महाशिवरात्रीस मोठी यात्रा भरत असून विविध जगभरामील लोक या यात्रेला येत असतात.आदीवाशी लोक आप –आपल्या संस्कृती नुसार ढोल ताशे वाजवून शिंवलिगाची पुजा –अर्चा करतात.



## **निष्कर्ष :**

नागपूर जिल्हयातील नरखेड तालुक्यातील धार्मिक स्थळांच्या विकासाकरिता विविध उपक्रम राबविले

जात असुन पुरातन मंदिराचे ऐतिहासिक, धार्मिक, सांस्कृतिक महत्व लक्षात घेणे गरजेचे आहे. ही स्थळे जागतिक पातळीवर आल्यास पर्यटनवृध्दी होऊन स्थानिक लोकांना रोजगाार प्राप्त होईल व आर्थिक विकासात भर पडेल. नरखेड तालुक्यातील या पुरातन स्थाळाकडे शासनाने लक्ष देऊन त्यावर निधी खर्च करून या दुर्लक्षित स्थाळाना प्रकाशाच्या झोतात आणून या धार्मिक स्थळांचे जतन व संवर्धन करून त्याचा विकास करणे गरजेचे आहे.

**संदर्भ सूची :**


- **पाठक अरूणचंद्र** : महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर नागपूर जिल्हा भाग दर्शनिका विभाग महाराष्ट्र शासन मुंबई प्रथम आवृत्ती २००५
- **टेंभेकर नलिनी** : पूर्व विदर्भातील ऐतिहासिक व प्रेक्षणीय स्थळे पिंपळापुरे बुक डिस्ट्रिब्युटर्स नागपूर प्रथम आवृत्ती २०१० पृष्ठ क्र –१२०–१२२
- pilgrim Data Services
- https://share.google /dn6co49aslsfvhHbB
- **चत्रे वसंत:** आदयकवी मुकुदराज रचित विवेकसिंधु मराठीतील वेदांत ज्ञानाचा 'मुलारंभ' व्दितीय आवृत्ती एस प्रकाशन नागपूर पृ.क्र १६०
- **ह.भ. प. रामायणाचार्य रामराव महाराज ढोक** : अमृतदर्शन स्मरणिका